# फळसेवाडी हितकारी संस्था

फळसेवाडी, गाव – पिसेकामते, तालूका – कणकवली, जिल्हा – सिंधुदूर्ग, महाराष्ट्र राज्य

## सर्वसाधारण सभा – इतिवृत्त

दिनांक १४ सप्टेंबर २०१८

दिनांक ११ ऑगष्ट २०१८ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत फळसेवाडी हितकारी संस्थेची स्थानिक सर्वसाधारण सभा गणपती उत्सवादरम्याण दिनांक १४ सप्टेंबर २०१८ रोजी घेण्याचे ठरविण्यात आले होते.

वार्षिक सर्वसाधारण सभेत ठरविलेल्या ठरावास अनुसरुन प्राथमिक सभा दिनांक १० सप्टेंबर २०१८ रोजी श्री रत्नाकर नाना राणे यांच्या अंगणात घेण्यात आली. त्या सभेत ब्राह्मण विहीर व साटम विहीर यावर पंप लावून आखलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या उद्‌घाटणासंर्दभात चर्चा झाली असता ही योजना स्थानिक लोकांनी स्वखर्चाने तयार केली असल्यामुळे या योजनेचे उद्‌घाटन वाडीतील जेष्ठ नागरिक व सुहासिनी मार्फत करण्यात यावे असे ठरविण्यात आले.

वरील चर्चेचे सुत्र धरुन शुक्रवार दिनांक १४ सप्टेंबर २०१८ ची सभा आयोजित करण्यात आली असता खालील ग्रामस्थ सभेस उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे (सचिव) | 2. श्री पांडूरंग सावजी राणे |
| 3. श्री उदय भगवान राणे (खजिनदार) | 4. श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे |
| 5. श्री रत्नाकर नाना राणे | 6. श्री सचिन निळकंठ राणे |
| 7. श्री हेमंतकुमार रमेश राणे | 8. श्री उत्तम वामन राणे |
| 9. श्री संदेश चंद्रकांत सावंत | 10. श्री दिपेश विजय साटम |
| 11. श्री अंकुश मारुती राणे | 12. श्री सत्यवान गणपत सावंत |
| 13. श्री अरुण वासुदेव राणे | 14. श्री रामदास मारुती राणे |
| 15. श्री सुनिल विनायक राणे | 16. श्री प्रितेश रत्नाकर राणे |
| 17. श्री सिध्देश विजय साटम | 18. श्री साहिल भिकाजी राणे |
| 19. श्री स्वप्निल जयवंत राणे | 20. श्री शुभम दिलिप राणे |
| 21. श्री रुपेश विजय साटम | 22. श्री राजेश अविनाश राणे |
| 23. श्री गौरव दशरथ राणे | 24. श्री निनाद रत्नाकर राणे |
| 25. श्री दिनेश दत्ताराम साटम | 26. श्री संकेत रत्नाकर राणे |
| 27. श्री प्रितम रमेश राणे | 28. श्री संतोष मधुसुदन राणे |
| 29. श्री मनोहर भिकाजी राणे | 30. श्री रमेश रघुनाथ राणे |
| 31. श्री सत्यविजय शिवराम राणे | 32. श्री मिलिंद सदानंद राणे |
| 33. श्री मेघश्याम नारायण राणे | 34. श्री अरुण राघोजी राणे |
| 35. श्री रत्नकांत बाळशिवाजी राणे | 36. श्री मंगेश यशवंत सावंत |
| 37. श्री तुकाराम (बाळा) विनायक राणे | 38. श्री विलास पुंडलिक राणे |
| 39. श्री रावजी एकनाथ राणे | 40. श्री मिहिर राणे |
| 41. श्री वासुदेव रावजी म्हसकर | 42. शंकर बाळकृष्ण राणे |
| 43. श्री दिलीप मधुकर राणे | |

दिनांक १० सप्टेंबर २०१८ रोजी करण्यात आलेल्या चर्चेस अनुसरुन शुक्रवार दिनांक १४ सप्टेंबर २०१८ रोजी रात्री ९:०० वाजता फळसेवाडी हितकारी संस्था, स्थानिक व मुंबईस्थित ग्रामस्थांची सभा श्री तुकाराम (बाळा) विनायक राणे यांचे अंगणात पार पडली. या सभेस एकूण ४३ सभासद / ग्रामस्थ उपस्थित होते.

फळसेवाडी हितकारी संस्थेच्या कार्यकारीणीचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे मुंबईस असल्यामुळे सचिवांनी श्री पांडूरंग सावजी राणे यांस सभाध्यक्ष स्थान स्विकारण्याची विनंती केली. सभाअध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरवात करून खालील बाबींवर चर्चा करण्यात आली.

ब्राह्मण देवाचे पुजन श्री मनोहर भिकाजी राणे यांचे हस्ते करण्याचे ठरविण्यात आले. तसेच ब्राह्मण विहीरीवरुन होणाऱ्या पाणीपुरवठा योजनेअंर्तगत लावण्यात आलेल्या पंपाचे पुजन सौ श्रेया संकेत राणे, सौ सुषमा सत्यविजय राणे, सौ आशालता रमेश राणे, सौ रेश्मा रामदास राणे आणि सौ अश्विनी आनंद साटम यांच्या हस्ते दिनाकं १७ सप्टेंबर २०१८ रोजी सकाळी १०:०० वाजता करण्याचे ठरविण्यात आले.

*ताजा कलम - दिनांक १७ सप्टेंबर २०१८ रोजी सकाळी १०:०० वाजता ब्राह्मण देवाचे पुजन श्री मनोहर भिकाजी राणे यांच्या हस्ते करण्यात आले, तसेच श्री एकनाथ अनंत राणे आणि श्री मनोहर भिकाजी राणे यांचे हस्ते श्रीफळ वाढवून हा कार्यक्रम पार पाडण्यात आला. यावेळी उपस्थितांना लाडू वाटप करुन आनंद व्यक्त करण्यात आला.*

ब्राह्मण विहीर आणि साटमांची विहीर या दोन्ही विहीरींचा पाणीपुरवठा कदाचित पुरणार नाही याचा विचार करून ब्राह्मण विहीरीचे रुंदीकरण करणे आणि डोहाची चिंच येथे नविन विहीर खोदणे याबाबत चर्चा करण्यात आली. डोहाची चिंच येथील खोदण्यात येणाऱ्या विहीरीसाठी कोणत्या ग्रामस्थाची जमीन वापरली जाणार आहे हे नक्की करण्यासाठी तसेच ब्राह्मण विहीरीच्या रुंदीकरणापूर्वी ही विहीर असलेली जागा कोणाच्या नावावर आहे याची खात्री करण्यासाठी या ठिकाणावरील जमीनीचे सर्वेक्षण करुन घेण्याचे यापूर्वी ठरविण्यात आले आहे.

श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे यांनी ब्राह्मण विहीर तसेच डोहाच्या चिंचेजवळील प्रयोजित विहीर यांच्या जागेच्या सर्वेक्षणाबद्दल मिळविलेली माहीती उपस्थितांस दिली. श्री प्रकाश हरिश्चंद राणे यांना मिळविलेल्या माहीतीनुसार या कामास रु.८,०००/- पर्यंत खर्च येईल अशी माहिती भुलेखा विभागातील कर्मचाऱ्याकडून मिळाली असल्याचे सांगितल्यावर श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे यांस या कामासाठी रु.८,०००/- सुपूर्द करण्यात आले व काम लवकरात लवकर पूर्ण करून घेण्याची सूचना करण्यात आली.

स्वयंपूर्ण नळयोजनेमार्फत पाणीपुरवठा योजनेची संपूर्ण माहीती श्री रत्नाकर नाना राणे यांनी उपस्थितांस दिली व सांगितले की आजपावतो या योजने अंर्तगत जवळपास रु.५,३३,०००/- इतका खर्च झालेला आहे.

श्री सुनिल सदानंद राणे यांनी पाणीपुरवठा योजनेअंर्तगत बांधण्यात आलेल्या टाकीसाठी श्री अंकुश मारुती राणे यांनी जागा दिल्याबदल त्यांचे आभार मानले. तसेच ही नळयोजनेव्दारे पाणीपुरवठा योजना मार्गी लावण्यासाठी स्थानिक कार्यकारीणी सदस्य सर्वश्री संकेत रत्नाकर राणे, रामदास मारुती राणे आणि सौ अनुजा अरुण राणे यांचेशिवाय सर्वश्री रत्नाकर नाना राणे, अंकुश मारुती राणे, तुकाराम विनायक राणे, अरुण वासुदेव राणे आणि इतर स्थानिक ग्रामस्थ यांनी भरपूर परिश्रम घेतले असून त्यांच्या सहकार्यामुळेच ही योजना वेळेत पूर्ण झाली असल्यामुळे श्री सुनिल

सदानंद राणे यांनी सर्वानी केलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे हार्दिक आभार मानले. ही योजना व्यवस्थित कार्यान्वित व्हावी यासाठी श्री रत्नाकर नाना राणे यांनी आपला बहुमुल्य वेळ खर्चून व्यवस्थित मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचेही उपस्थितांकडून अभिनंदन मानन्यात आले.

श्री रत्नाकर नाना राणे यांनी उपस्थितांस सांगितले की कै विठोबा साबाजी साटम ते टेंब येथे येणाऱ्या रस्त्यावर फुटकळ इत्यादि टाकून पावसाळ्यात वाहने जाण्यायोग्य रस्ता दुरुस्त करुन घेण्यात आला आहे. या कामासाठी अंदाजे रु.४८,०००/- इतका खर्च झालेला आहे. तरी वरील दोन्ही खर्च एकत्रित केल्यास फळसेवाडी हितकारी संस्थेतर्फे जवळपास रु.६,००,०००/- इतका खर्च करण्यात आलेला असून या खर्चाची उभारणी ग्रामस्थांनी करावयाची आहे.

श्री रत्नाकर नाना राणे आणि श्री अंकुश मारुती राणे यांच्यातर्फे मुद्दा मांडण्यात आला की फळसेवाडी हितकारी संस्थेची सभासदसंख्या वाढविण्यासाठी नुसती परिपत्रके काढणे पुरसे नसून संस्थेतर्फे ब्राम्हणभोजन प्रसंगी गावी स्नेहसंम्मेलन आयोजित करावयास हवे व या कार्यक्रमास जास्तीत जास्त लोकांस आमंत्रित करुन त्यांस गावी उपस्थित राहण्याचे आवाहन करावयास हवे. तसेच यादिवशी श्री सत्यनारायणाची पूजा आयोजित करुन मुलांचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम ठेवावे जेणेकरुन ग्रामस्थांमध्ये एकमेकांबद्दल प्रेमभावना वाढीस लागून सभासदसंख्या वाढीस चालना मिळेल.

स्थानिक ग्रामस्थांतर्फे सूचना करण्यात आली की ब्राह्मण भोजन कार्यक्रमाच्या पुर्वतयारीसाठी स्थानिक मनुष्यबळ कमी पडते यासाठी ब्राह्मण भोजनाची तारीख ठरल्यानंतर ठरविलेल्या तारखेच्या अगोदर काही दिवस जास्तीत जास्त ग्रामस्थ गावी उपस्थित राहील्यास स्थानिकांस त्यांचे सहकार्य मिळेल व कामास हातभार लागले.

श्री दिलीप मधुकर राणे यांनी मुद्दा मांडला की ब्राह्मण विहीर मोठी करावी तसेच या विहीरीस घरटण आणि माडाचे पाणी येथील झऱ्यापासून पाणीपुरवठा असल्यामुळे या दोन्ही ठिकाणी छोटे बंधारे बांधल्यास ब्राह्मण विहीरीस भरपूर पाणी पुरवठा होईल.

श्री सुनिल सदानंद राणे यांनी माहीती दिली की त्यांनी पिसेकामते ग्रामपंचायतीचे सरपंच श्री सुहास राणे यांस गाडीतळ ते श्री पांडूरंग सावजी राणे यांच्या घरापर्यंत आखणी केलेल्या रस्त्याचे खडीकरण आणि डांबरीकरण करुन देण्याबद्दल स्मरण केले असून स्थानिकांनी याबाबत पाठपुरावा करावा.

श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे यांनी श्री लिंगेश्वर देवस्थान सन २०१८ – १९ सालासाठी वार्षिक वर्गणी रु. ५००/- बसविली असल्याची माहीती देऊन उपस्थितांना ही वर्गणी लवकरात लवकर भरण्याची विनंती केली. या वार्षिक वर्गणीमध्ये सप्तापट्टी, दहिकालापट्टी, पारध, दसरा या सर्व वार्षिक कामांचा सामावेश असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री रत्नाकर नाना राणे यांनी सांगितले की श्री लिंगेश्वर देवस्थानामध्ये आपल्या वाडीतर्फे ब्राम्हणभोजन करण्यात येते यावेळी जवळपास रु.३०००/- ते रु.४०००/- पर्यंत खर्च येतो तरी या खर्चाच्या तरतुदीसाठी प्रत्येक घराने रु. २००/- वर्गणी जमा करावी. तसेच देवाच्या सप्त्याच्या वेळी फळसेवाडीतून मनुष्यबळ कमी पडत असल्यामुळे चार तासाचा भजन कार्यक्रम करणे अवघड होते तर हा कार्यक्रम कोणत्या दुसऱ्या वाडीने घेतल्यास फळसेवाडीतर्फे त्यांच्या

चहापाण्याच्या कार्यक्रमाचा खर्च करण्यात येईल ही बाब फळसेवाडी हितकारी संस्थे मार्फत पिसेकामते विकास मंडळाकडे मांडण्यात यावी व यावर चर्चा करण्यात यावी असे सुचविले.

श्री रत्नाकर नाना राणे यांनी उपस्थितांस सूचना केली की गणपती उत्सवादरम्यास वेळच्यावेळी पाणीपुरवठा व्यवस्था चालविण्याची जबाबदारी श्री अरुण वासुदेव राणे आणि सौ आकांशा अंकुश राणे यांनी आपल्या शिरावर घेतली असून ग्रामस्थांस दिवसातून दोनवेळा पाणीपुरवठा केला जात आहे. या कामासाठी प्रत्येक घरामागे रु.५०/- रक्कम बसवून या दोन्ही ग्रामस्थांना त्यांच्या कामाबद्दल छोटासा मोबदला द्यावयाचा विचार व्हावा.

वाडीमध्ये भरपूर समस्या आहेत व त्या एका रात्रीमध्ये संपणार नाहीत तरी आपण  टप्याटप्याने काम करुन या समस्या मार्गी लावू असे सचिवांनी सांगितले.

यानंतर कुमारी अनुष्का अंकुश राणे हिचा सत्कार (कै सदानंद श्रीधर राणे यांचे स्मृती प्रित्यर्थ) वाडीतील जेष्ठ ग्रामस्थ श्री मनोहर भिकाजी राणे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच यावर्षी बारावीच्या परीक्षेस बसणाऱ्या कुमारी रेणूका रामदास राणे, कुमार प्रितेश रत्नाकर राणे आणि कुमार साहिल भिकाजी राणे यांस सर्वांतर्फे शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच सभेस उपस्थित नसलेल्या वाडीतील तसेच मुंबईतील इतर विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. सचिवांनी पुढील कालावधीमध्ये मुंबईमध्ये असा कार्यक्रम करण्याचा विचार आहे असे सर्वास सांगितले.

सचिवांनी उपस्थितांस माहीती दिली की वाडीमध्ये महिला बचतगट कार्यरत असून पुढील वर्षासाठी पिठाचे लाडू, कुळीथ पिठ इत्यादी आर्डर ग्रामस्थांना द्यावयाच्या असल्यास त्यांनी त्या फळसेवाडी हितकारी संस्थेकडे द्याव्यात जेणेकरुन त्या बचतगटापर्यंत पोहोचविण्याचे काम संस्था करेल.

सचिवांनी शेवटी उपस्थितांस सूचना केली की वाडीतील सर्वांनी फळसेवाडी हितकारी संस्थेचे सभासद लवकरात लवकर व्हावे, संस्थेची वार्षिक वर्गणी वेळच्यावेळी त्या त्या विभागातील कार्यकारीणी सदस्यांस पोहचती करावी किंवा संस्थेच्या बँक खात्याची माहीती सर्व सभासदांस पाठविली असल्यामुळे शक्य झाल्यास संस्थेच्या बँक खात्यामध्ये वर्गणीची रक्कम जमा करावी तसेच ब्राह्मण भोजनासाठी जी रक्कम ठरविली असेल ती स्थानिक कार्यकारीणी सदस्यांकडे जमा करण्यात यावी.

सचिवांनी उपस्थितांस आवाहन केले की सर्वांनी एकत्रितपणे संघशक्तीने काम केल्यास सर्व कामे पुर्णत्वास जाऊन सर्वांचा फायदा होईल.

त्यानंतर सभाध्यक्षांच्या परवानगीने सभा रात्री  ११:०० संपल्याचे सचिवानी जाहीर केले.

श्री सुनिल सदानंद राणे
सचिव

श्री पांडूरंग सावजी राणे
सभाध्यक्ष  व कार्यकारीणी सदस्य